# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर; विविध विकासकामांचा करणार प्रारंभ
2. देशातील सर्वात मोठ्या वाढवण बंदराची पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी
3. केंद्र सरकारनं इथेनॉल उत्पादनावरील बंदी उठवली; मुख्यमंत्र्यांनी मानले आभार
4. सोलापूर विमानतळ कार्यान्वित करण्यासाठीची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे निर्देश आणि
5. दहशतवाद विरोधी पथकाकडून पुण्यात बनावट टेलिफोन एक्सचेंज उध्वस्त

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असून मुंबई आणि पालघरमध्ये त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी मुंबईत जागतिक अर्थतांत्रिक महोत्सवात पंतप्रधानांचं भाषण होणार आहे. त्यानंतर दुपारी पालघर इथं पंतप्रधानांच्या हस्ते वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ होईल तसंच अन्य विकास प्रकल्पांचा पायाभरणी समारंभ आणि उद्घाटनही होणार आहे. वाढवण इथं देशातलं सर्वात मोठं आणि समुद्रात अधिक खोलवर असलेलं बंदर बांधण्यात येत आहे. या बंदरात अतीविशाल मालवाहतूक जहाजं उभारणं शक्य होईल आणि त्यामुळे देशाच्या सागरी व्यापाराला आणि पर्यायानं अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना मिळेल. पंतप्रधानांच्या हस्ते 218 मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचंही उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे. यातून पाच लाखांहून अधिक रोजगारनिर्मितीची अपेक्षा आहे.

**<u>वाढवण बंदर-सोनोवाल</u>**

वाढवण बंदरामुळे राज्याची आणि देशाची एक वेगळी ओळख जगात निर्माण होईल असा विश्वास केंद्रिय जहाजबांधणी, बंदर आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी व्यक्त केला आहे. ते काल पालघर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. हे जगातल्या सर्वोत्तम 10 बंदरांपैकी एक असेल. या बंदरामुळे आंतरराष्ट्रीय जहाजमार्गांशी भारत थेट जोडला जाईल, वेळ आणि पैशांची बचत होईल तसंच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मिळून सुमारे 12 लाख रोजगारनिर्मिती होईल असं सोनोवाल म्हणाले.

**<u>साखर कारखाना</u>**

केंद्र सरकारनं 2024-25 च्या गाळप हंगामासाठी उसाचा रस, साखरेचा पाक आणि बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मिती करण्यावरची बंदी उठवली आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना आता इथेनॉल निर्मिती करता येणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील साखर कारखान्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र शासनाचे आभार मानले आहेत. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध आणले होते. हे निर्बंध हटवून साखर कारखान्यांना इथेनॉल निर्मितीची परवानगी देण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला होता.

**<u>मुख्यमंत्री-मूर्तिकार</u>**

मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबाबत घडलेल्या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या विषयावर चर्चा करण्यासाठी काल वर्षा या निवासस्थानी विशेष बैठक घेतली. त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी त्यांनी नुकत्याच काही शिल्पकारांच्या भेटीही घेतल्या आहेत. दरम्यान या दुर्घटनेनंतर शासनाने दोन

तांत्रिक समित्या स्थापन करण्याची अधिसूचना जाहीर केली आहे. पहिली समिती दुर्घटनेची कारणमीमांसा करण्यासाठी तयार केली आहे तर दुसरी समिती ही त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थापन करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

**राष्ट्रवादी आंदोलन-मुंबई**

राजकोट इथल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दुर्घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनं काल राज्यात ठिकठिकाणी आत्मक्लेश मूक आंदोलन करण्यात आलं. आंदोलनानंतर दोषींवर कारवाई करण्याची मागणी करणारं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलं.

**कोकण रेल्वे-मुंबई**

केंद्रिय मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते हिरवं निशाण दाखवून काल बोरिवली स्थानकातून विशेष कोकण रेल्वे सोडण्यात आली. केंद्रिय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमाला दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. खऱ्या मनानं प्रयत्न केला आणि सर्वांना सोबत घेऊन पुढे गेलो तर मोठ्यातलं मोठं आव्हान जिंकू शकतो आणि लोकांच्या जीवनात बदल आणू शकतो, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले. निवडणूक काळात गणेशोत्सवासाठी विशेष रेल्वेची मागणी करण्यात आली होती, ती पूर्ण झाल्याचा आनंद आहे असं गोयल यांनी यावेळी सांगितलं.

**मोहोळ विमानतळ**

सोलापूर विमानतळासाठी आवश्यक असलेला नागरी हवाई वाहतूक प्राधिकरणाचा परवाना आणि अन्य तांत्रिक प्रक्रिया लवकरच पूर्ण करावी असे निर्देश नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले आहेत. सोलापूर विमानतळासंदर्भात नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत मोहोळ यांनी हे निर्देश दिले. सध्या हवाई वाहतुकीच्या अनुषंगानं आवश्यक कामं युद्धपातळीवर सुरू असून लवकरच सोलापूर विमानतळ कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, पुणे विमानतळाच्या जुन्या टर्मिनलवर आणखी 16 चेक इन काऊंटर्स सुरू करण्यात येतील अशी माहिती मोहोळ यांनी दिली. नव्या चेक इन काऊंटरसह सध्याच्या जुन्या टर्मिनल इमारतीच्या आगमन कक्षाचा कायापालट करून त्याला नव्या एकात्मिक टर्मिनल इमारतीशी पुलाच्या माध्यमातून जोडलं जाईल. नव्या टर्मिनलशी एकात्मिक असणारी विमानतळ प्रणाली वापरण्याचा आणि व्यावसायिक दालनं उभारण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. मार्च 2025 पर्यंत हे काम पूर्ण होईल असं मोहोळ यांनी सांगितलं.

**शिक्षक पुरस्कार-गडचिरोली**

केंद्र सरकारच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची घोषणा नुकतीच झाली. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील आदिवासीबहुल जाजावंडी इथल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक मंतय्या बेडके यांना यंदा हा पुरस्कार जाहीर झाला आहे. याबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना मंतय्या बेडके म्हणाले......

**यूपीएससी आधार**

केंद्रिय लोकसेवा आयोगाला उमेदवारांची ओळख पटवण्यासाठी आधार क्रमांक आधारित ओळख पडताळणीला केंद्र सरकारनं परवानगी दिली आहे. नोंदणीच्या वेळी आणि परीक्षेच्या तसंच भरतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आधार क्रमांक आधारित ओळख पडताळणीलाही सरकारनं मान्यता दिली. पूजा खेडकर हिनं आयोगाला सादर केलेलं दिव्यांगत्वाचं आणि अन्य प्रमाणपत्रं बनावट असल्याचं आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**परिषद**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन आणि कार्याचं एकविसाव्या शतकातील महत्त्व आणि समयोचितता' या विषयावर आजपासून दोन दिवस राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवानिमित्त आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला 350 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्तानं या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. मंत्री चंद्रकांत पाटील आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. या राष्ट्रीय परिषदेसाठी देशभरातून आणि राज्यातून 75 शोधनिबंधांची नोंदणी झाली आहे.

**<u>सिंधुदुर्गनगरी-आकाशवाणी</u>**

आकाशवाणी सिंधुदुर्ग नगरी केंद्राचा पंधरावा वर्धापन दिन नुकताच साजरा झाला. 28 ऑगस्ट 2009 ला या सहक्षेपण केंद्राची सुरुवात झाली. यानिमित्तानं आयोजित विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियांत्रिकी विभागाचे उपमहानिदेशक आणि गोवा क्लस्टर प्रमुख सुनील भाटिया, कार्यक्रम विभाग प्रमुख सुजाता कहाळेकर यांच्यासह सर्व कर्मचारी आणि निवेदक उपस्थित होते. केंद्र उभारणीपासून आजपर्यंत या केंद्राच्या विकासाचे साक्षीदार असलेल्या पाच कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. अत्यंत कमी कर्मचारी असतानाही या केंद्रानं अल्पावधीत तीनही प्रसारणाला सुरुवात केली तसंच मोठ्या प्रमाणात महसूलही मिळवून दिला आहे.

**<u>कौशल्य-उईके-नंदुरबार</u>**

नंदुरबारच्या राजणी गावात उभारण्यात आलेल्या कौशल्य भारत केंद्राचं उद्घाटन केंद्रीय आदिवासी राज्यमंत्री दुर्गादास उईके यांच्या हस्ते काल झालं. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागात उभारण्यात आलेलं हे देशातलं पहिलं कौशल्य भारत केंद्र आहे. या केंद्राच्या माध्यमातून आदिवासींना कृषी प्रक्रीया उद्योगासाठी प्रशिक्षण मिळणार असल्याचं उईके यांनी सांगितलं.

**<u>नक्षली अटक-गडचिरोली</u>**

गडचिरोली इथल्या नक्षलवाद्यांच्या अहेरी दलमचा कमांडर विकास उर्फ सैनू मुंशी जेट्टी याला छत्तीसगड पोलिसांनी काल अटक केली. त्याच्याकडून काही रोकड आणि नक्षली साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगण अशा तिन्ही राज्यांमध्ये तो सक्रिय होता. त्याच्यावर महाराष्ट्र आणि छत्तीसगड सरकारचं एकंदर 24 लाखांचं बक्षीस होतं.

**<u>नवीन कायदे प्रदर्शन-सांगली</u>**

केंद्रिय संचार ब्युरो आणि पोलिसांनी सांगली इथं नवीन कायद्यांवर आधारित चित्र प्रदर्शन आयोजित केलं आहे. काल या प्रदर्शनाचं उद्घाटन विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्या हस्ते झालं. अत्यंत चांगल्या सुबोध मराठी भाषेमध्ये इथं नवीन कायद्यांविषयी माहिती दिली आहे. सर्वसामान्य नागरिक आणि शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन कायद्याची माहिती घ्यावी असं आवाहन सुनील फुलारी यांनी यावेळी केलं.

**<u>एटीएस कारवाई</u>**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दहशतवाद विरोधी पथकानं काल पुण्यातल्या कोंढवा परिसरात सुरू असलेल्या बनावट टेलिफोन एक्सचेंजवर छापा टाकला आणि संवेदनशील साहित्य जप्त केलं. परदेशातून भारतात येणारे आंतरराष्ट्रीय दूरध्वनी भारतातील यंत्रणेला समजू न देण्यासाठी या बनावट टेलिफोन एक्सचेंजचा वापर होत असल्याची प्राथमिक माहिती आहे. या कारवाईत 3 हजार 788 सीम कार्ड आणि विविध प्रकारची यंत्रसामुग्री पोलिसांनी ताब्यात घेतली असून एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात येत्या 24 तासात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.